महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित
महाराष्ट्र शासन उपक्रम (CIN : U40100MH2005SGC153648)
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, धारावी रोड, माटुंगा, मुंबई - ४०० ०१९.
दुरध्वनी ०२२-६९४२५००० website: www.mahagenco.in Email ID- apoclaims@mahagenco.in

क्र. महानिर्मिती/समव्य/मासं-देयके/ 5647 दिनांक : 2 01 JUN 2023

# परिपत्रक

**विषय :** अंतिम रजा रोखीकरण अदा करतेवेळी आयकर कायद्यातील कलम १०, उप कलम १०-अ अ नूसार आयकरातून सूट देणेबाबत.

**संदर्भ :** १) Gazette of INDIA Part II-SEC.३ (ii) दि. २४.०५.२०२३.
२) वित्त मंत्रालय, भारत सरकार यांचे महसूल विभागाचे प्रसिध्दी पत्रक (Press Release) दि. २५.०५.२०२३.

-------------

महानिर्मिती कंपनीतील सेवानिवृत्त झालेले/होणारे अधिकारी/कर्मचारी यांना अंतिम रजा रोखीकरण अदा करतेवेळी आयकर कायदा १९६१ मधील तरतुदींनूसार आयकर कपातीबाबत खालीलप्रमाणे निर्देशित करण्यात येत आहे.

१. सांघिक कार्यालय व सर्व क्षेत्रिय कार्यालयांना सूचित करण्यात येते की, सेवानिवृत्त झालेले/होणारे अधिकारी/कर्मचारी यांचे अंतिम रजा रोखीकरण अदा करतेवेळी आयकर कायदा १९६१ चे कलम १०, उप कलम १०-अ अ नूसार आयकर कपातीबाबतची कार्यवाही करावी.

२. अंतिम रजा रोखीकरण संदर्भात आयकर कायद्यातील कलम १०, उप कलम १०-अ अ नूसार तसेच वित्त मंत्रालय, भारत सरकार यांचे महसूल विभागाचे सूचना पत्रक क्र. ३१/२०२३/ एफ.न./२००/०३/ २०२३/आर.टी.ए.१ दि. २४.०५.२०२३ आणि वित्त मंत्रालय, भारत सरकार यांचे महसूल विभागाचे प्रसिध्दी पत्रक (Press Release) दि. २५.०५.२०२३ मधील तरतुदींनूसार अर्जित रजेवर रु २५,००,०००/- (रुपये पंचवीस लाख) पर्यंत सूट देण्याची तरतुद आहे व त्याप्रमाणे कार्यवाही करावी. सदर अधिसुचनेनूसार सदरील तरतुद दि. ०१.०४.२०२३ पासून लागू समजण्यात यावी.

३. महानिर्मिती कंपनीतील जे अधिकारी/कर्मचारी दि. ०१.०४.२०२३ पूर्वी कंपनीच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेले असतील त्यांना सेवानिवृत्तीनंतरच्या अंतिम रजा रोखीकरणाकरीता पूर्वीप्रमाणेच (अर्जित रजेवर ३ लाखापर्यंत) आयकर कपातीची तरतुद लागू राहील. त्यामुळे सदर तरतुदीचा लाभ मिळणार नाही.

४. करीता, सांघिक कार्यालय/ सर्व क्षेत्रिय कार्यालयांनी सेवानिवृत्त झालेले/होणारे अधिकारी/कर्मचारी यांचे अंतिम रजा रोखीकरण अदा करतेवेळी आयकर कायदा १९६१ च्या तरतुदीचे काटेकोर पालन करावे. यामध्ये अनियमितता आढळल्यास संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर शिस्तभंग कारवाई करण्यात येईल.

सदर परिपत्रक https://esevarth.mahagenco.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(आनंद आबाराव कोंत)
20.06.23
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

**प्रत :**
महानिर्मिती कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे.

Scanned with OKEN Scanner